RCS 38/2026
Exh. 5

रे.क.नं.        /२०२६

मे.दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कागल

यांचे न्यायालयात......

| | | |
|---|---|---|
| श्री.रघुनाथ विनायक माने,<br>व.व.६०, धंदा.शेती,<br>रा.माने मळा, मौजे सांगाव,<br>ता.कागल, जि.कोल्हापूर | } | वादी |

विरूद्ध

| | | |
|---|---|---|
| १) श्रीमती भागिरथी विनायक माने,<br>व.व.८५, धंदा.काही नाही,<br>रा.माने मळा, मौजे सांगाव,<br>ता.कागल, जि.कोल्हापूर | } | प्रतिवादी |

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

२) श्री.दिलीप विनायक माने,
व.व.५५, धंदा.शेती,
रा.माने मळा, मौजे सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर

३-अ) सुशिला रंगराव माने,
व.व.६५, धंदा.घरकाम,
रा.माने मळा, मौजे सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर

३-ब) सुप्रिया धनाजी आडोळे,
व.व.३५, धंदा.नोकरी व घरकाम,
रा.जयसिंगराव पार्क, कागल,
ता.कागल, जि.कोल्हापूर

३-क) सौ.माधुरी चेतन माळी,
(माधूरी रंगराव माने-लग्नापुर्वीचे नांव)
व.व.३२, धंदा.नोकरी व घरकाम,
रा.माळी गल्ली, कसबा सांगाव,
ता.कागल, जि.कोल्हापूर

४) सुमन वसंत पाटील,
व.व.५८, धंदा.घरकाम,
रा.गुरव गल्ली, म्हाकवे,
ता.कागल, जि.कोल्हापूर

} प्रतिवादी

<u>सी.पी.सी.ऑर्डर ३९ रूल १ व २</u>

<u>प्रमाणे तुर्तातुर्त मनाईचा अर्ज</u>

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn..
Kagal

Scanned with OKEN Scanner

यातील वादी यांचा अर्ज असा की,

यातील वादी यांनी प्रतिवादीविरूद्ध अविभक्त कुटूंबाच्या मिळकतीसंबंधी सरस- निरस मानाने वाटपाचा, व कायम मनाईसाठी दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा गुणदोषावर निकाली होणेस बराच विलंब लागणार आहे. सबब, वादी प्रस्तुतचा तुतातुर्त मनाई दाखल करीत आहेत, त्यासी कारणे खालीलप्रमाणे:

१. दावा मिळकतीचे वर्णन :

ए) जिल्हा कोल्हापूर, तालुका कागल पैकी मौजे सांगाव या गावचे हद्दीतील शेतजमीन मिळकती खालीलप्रमाणे :

| अ. नं. | भूमापन गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | यापैकी क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८५/२ | 0-४६ | २-२७ | 0-0३.८४ | 0-१९ |
| २ | १९१ | 0-६१.३0 | ४-१२ | 0-२३.६२ | १-५९ |
| ३ | २१६ | 0-१३ | 0-९९ | 0-0३.२५ | 0-२५ |
| ४ | २२४ | १-३७ | १३-७0 | 0-३४.२५ | ३-४२ |
| ५ | २४६ | 0-५५ | ६-३७ | 0-१३.७४ | १-५९ |

बी) जिल्हा कोल्हापूर, तालुका कागल पैकी कसबा सांगाव या गावचे हद्दीतील शेतजमीन मिळकती खालीलप्रमाणे :


| अ. नं. | भूमापन गट नंबर | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. | यापैकी क्षेत्र हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १४५४ | 0-१६ | १-८८ | 0-१६ | १-८८ |
| २ | १४६५ | 0-0६ | 0-६८ | 0-0६ | 0-६८ |

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal
07/03/2026

Scanned with OKEN Scanner

...... येणेप्रमाणे वर्णनाच्या 'ए' व 'बी' शेतजमीन मिळकती या सदर दावेचा विषय असून येथून पुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.

२. <u>यातील वादी व प्रतिवादी यांची नाती दर्शवणारी वंशावळ खालीलप्रमाणे:</u>




...... येणेप्रमाणे वंशावळ होय.

वादी, प्रतिवादी यांचे मुळ पुरूष कै. विनायक गणू माने हे होत. सदर विनायक माने हे मयत असून त्यांना भागिरथी, रघुनाथ, दिलीप, कै. रंगराव व सुमन असे पत्नी, मुले व मुलगी सरळ वारस आहेत. त्यापैकी रंगराव हा मयत असून त्यास सुशिला ही पत्नी, सुप्रिया व माधूरी या मुली असे वारस आहेत.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

३. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मालकी व वहिवाटीच्या मिळकती आहेत. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/५ अविभक्त हिस्सा आहे व प्रत्येक प्रतिवादी यांचा प्रत्येकी १/५ अविभक्त हिस्सा आहे.

४. वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या दावा मिळकतीमध्ये वादी यांची १/५ इतक्या हिस्सेने पहिल्यापासून प्रत्यक्ष मालकी व वहिवाट चालू आहे. दावा शेतजमीनीमध्ये वादी हे समाईकात सालदरसाल स्वत: कष्ट मशागत करून ऊस, सोयाबीन, भुईमूग इ. पिके घेत असतात.

५. दावा मिळकती या यातील वादी व प्रतिवादी यांच्या वडिलार्जित व हिंदू एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. यातील वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान दावा मिळकतीबाबत केंव्हाही सरसनिरस मानाने अगर बाय मेड्स ॲण्ड बॉन्डस ने वाटप झालेले नव्हते व नाही.

६. यातील वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुटूंब हिंदू समाजाचे असून त्यास हिंदू कायदा लागू होतो. दावा मिळकतीपैकी समाईक मिळकतीमध्ये वादी यांचा हिंदू वारसा कायदयाने १/५ हिस्सा आहे. सदरचा हिस्सा तुटक होवून यातील वादींना कायदयाने मिळणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे.

७. वरीलप्रमाणे परिस्थिती असताना यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दि.०१.०३.२०२६ इ.रोजीचे (एक मार्च सन दोन हजार सव्वीस) दावा मिळकतीमध्ये असणारा कायदेशिर हिस्सा सरसनिरस मानाने तुटक

05/03/2026
Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

करून मागितला आता प्रतिवादी यांनी वाटप करून देणेचे स्पष्टपणे नाकारले आणि "आम्ही तुम्हांला दावा मिळकतीचे वाटप करून देणार नाही. तुम्हांला काय करायचे ते कर", असे प्रतिवादी यांनी धमकावले आहे. तसेच प्रतिवादी हे वादींना त्याचदिवशी दावा मिळकतीमध्ये सोई प्रमाणे समाईकात वहिवाट करणेस प्रतिबंध करणेचा प्रयत्न केला, त्यामुळे वादी यांना प्रतिवादी यांचेविरूद्ध वाटपाकरीता व कायम मनाई ताकीद होवून मिळणेकरीता सदरचा दावा दाखल करणे भाग पडत आहे.

८. दावेस व अर्जास कारण :

यातील वादी यांनी प्रतिवादी यांचेकडे दि.०१.०३.२०२६ इ.रोजीचे (एक मार्च सन दोन हजार सव्वीस) दावा मिळकतीमध्ये असणारा कायदेशिर हिस्सा सरसनिरस मानाने तुटक करून मागितला आता प्रतिवादी यांनी वाटप करून देणेचे स्पष्टपणे नाकारले आणि "आम्ही तुम्हांला दावा मिळकतीचे वाटप करून देणार नाही. तुम्हांला काय करायचे ते कर", असे प्रतिवादी यांनी धमकावले आहे. तसेच प्रतिवादी हे वादींना त्याचदिवशी दावा मिळकतीमध्ये सोईप्रमाणे समाई कात वहिवाट करणेस प्रतिबंध करणेचा प्रयत्न केला त्यावेळी सदरचे दावेस व अर्जास वेळोवेळी कारण घडले आहे.

९. प्रतिवादी यांचेविरूद्ध तुर्तातुर्त मनाईसारखा आदेश दिलेस त्यांचे काहीही नुकसान होणार नाही. याउलट त्यांचेविरूद्ध तसा आदेश न झालेस वादीचे कधीही न भरून येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

२. वादी यांना अंतिम यशाची पुर्ण खात्री असून प्रथमदर्शनी वादी यांनाच केस आहे.

३. न्यायाचा तराजू वादी यांचेच बाजूने आहे.

४. प्रस्तुत कामी कॅव्हेट दाखल नाही अगर कॅव्हेटची नोटीस वादी यांना लागू झालेली नाही.

५. सबब, वादी यांची विनंती की:

अ) प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणेत यावा.

ब) दावा मिळकतीमधील वादी यांच्या प्रतिवादी यांचेसोबत समाईकात सोईप्रमाणे सुरू असलेल्या शांततामय कब्जावहिवाटीस प्रतिवादी यांनी अगर त्यांचेतर्फे वालीवारस, नोकर चाकर, इ.इसमांनी हरकत, अडथळा करू नये व वादीस दावा मिळकतीतून हुसकावून (Oust) लावू नये याकरीता त्यांचेविरूद्ध दावेच्या अंतिम निकालापावेतो तुर्तातुर्त मनाई हुकूम करणेत यावा.

क) वरीलप्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश प्रतिवादीविरूद्ध प्रस्तुत मनाई अर्जाचे अंतिम निर्णयापर्यंत एकतर्फी प्रतिवादी अगर तर्फे इसमांविरूद्ध करणेत यावा.

ड) अर्जाचा कोर्ट खर्च प्रतिवादी कडून वसूल होवून मिळावा.

इ) जरूर तर अर्ज दुरूस्तीस परवानगी मिळावी.

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

ई) योग्य ते न्यायाचे हुकूम याच कामी करणेत यावेत.

...... येणेप्रमाणे अर्ज असे.

कागल मे.जा.व्हावे.

दि.०७/०३/२०२६ वादी

अर्ज तयार करणार व दाखल करणार

रघुनाथ विनायक माने

श्री.रघुनाथ विनायक माने

ॲड.बी.बी.मगदूम

<u>प्रतिज्ञा</u>

मी यातील वादी श्री.रघुनाथ विनायक माने, व.व.६0, धंदा.शेती, रा.माने मळा, मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपुर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कागल,

दि.०७/०३/२०२६.

रघुनाथ विनायक माने

Assistant Superintendent
Civil Court Jr. Dn.,
Kagal

Scanned with OKEN Scanner

## ॲफिडेव्हीट

मी यातील वादी श्री.रघुनाथ विनायक माने, व.व.६0, धंदा.शेती, रा.माने मळा, मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर देवाची शपथ घेवून सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील अर्जातील संपुर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे, म्हणून शपथेवर केले ॲफिडेव्हीट आज मु.कागल.दि.0७/0३/२०२६

प्रतिज्ञापत्र करणार यांस मी ओळखतो

रघुनाथ विनायक माने

ॲड.बी.बी.मगदूम

## प्रतिज्ञा

मी यातील वादी श्री.रघुनाथ विनायक माने, व.व.६0, धंदा.शेती, रा.माने मळा, मौजे सांगाव, ता.कागल, जि.कोल्हापूर सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील ॲफिडेव्हीटमधील संपुर्ण मजकूर माझे प्रत्यक्ष माहिती व समजुतीनुसार खरा व बरोबर आहे, म्हणून केली प्रतिज्ञा आज मु.कागल, दि.0७/0३/२०२६.

रघुनाथ विनायक माने

Solemnly Affirmed before me by
Shri रघुनाथ विनायक माने
[illegible]
Identified by Shri [illegible]
whom know personally
Dated 07/03/2026
Assistant Superintendent

Scanned with OKEN Scanner

MADKE AJIT BHISHMA
Digitally signed by MADKE AJIT BHISHMA
Date: 2026.03.12 17:19:55 +0530